




सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने शनिवारी न्यू होम मिनिस्टरचे आयोजन

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 29/10/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 251 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य शासनाचे सात महत्त्वाचे निर्णय!

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व सर्व प्रमुख मंत्र्यांच्या उपस्थितीत (मंगळवार, 28 ऑक्टोबर) मुंबईत राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.राज्यात येणारी परकीय गुंतवणूक वाढवण्यासाठी मंत्रालयात नवीन सेलची स्थापना करण्यासह वेगवेगळ्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. नियोजन, गृह, सामान्य प्रशासन, नगरविकास, ग्रामविकास, विधी व न्याय आणि महसूल विभागांतर्गत सात निर्णय घेण्यात आले आहेत.**



या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्तांच्या नुकसानीचा आढावा घेतला. तसेच 8 हजार कोटी रुपयांचे वाटप झाले असून 11 हजार कोटी रुपयांच्या वितरणाला मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे.

1. विकसित महाराष्ट्र-2047 च्या व्हिजन डॉक्युमेंटला मान्यता. विकसित महाराष्ट्र-2047 च्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट (व्हीएमयू) गठीत करणार.राज्यातील नागरिकांकडून मते व प्रतिसाद मागवून, त्यांचे एआय-आधारित विश्लेषण करुन डॉक्युमेंट तयार केले जाणार. राज्य व जिल्हा पातळीवरील 16 संकल्पना निश्चित. प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या अंतर्गत 100 उपक्रम निश्चित.

2. सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या सुधारित खर्चास व राज्य शासनाच्या 50 टक्के हिश्श्यानुसार अधिकचा निधी देण्यास मान्यता.

3. सामान्य प्रशासन विभागांतर्गत राजशिष्टाचार या उपविभागाचा विस्तार. सचिव (राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणुक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि आंतरराष्ट्रीय संपर्क) / Secretary (Protocol, FDI, Diaspora Affairs and Outreach) अशा पदनाम विस्तारास मान्यता. याशिवाय परकीय थेट गुंतवणूक (FDI), आंतरराष्ट्रीय संपर्क (Outreach) आणि परदेशस्थ नागरिकांचे विषय (Diaspora Affairs) अशा तीन नवीन कार्यासनांच्या निर्मितीस आणि या कार्यासनांसाठी आवश्यक पदांना मंजुरी.

4. महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींसाठी सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून येणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत. त्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी.

5. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आल्यानंतर उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत. त्यासाठी महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत देणे, अध्यादेश 2025 काढण्यास मान्यता.

6. धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालय. याशिवाय शासकीय अभियोक्ता कार्यालय होणार. या दोन्हींसाठी आवश्यक पदांना व खर्चाच्या तरतुदीस मंजुरी. 7. वाशिम जिल्ह्यातील सुविदे फाउंडेशन, रिसोड यांना मौजे करडा (ता. रिसोड) येथील 29.85 हे. आर जमीन. या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नाममात्र दराने (एक रुपया) पुढील 30 वर्षाकरिता नुतनीकरणास मान्यता

# महापालिका निवडणुकीसाठी 11 नोव्हेंबरला आरक्षण सोडत

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी येत्या 11 नोव्हेंबरला प्रारुप आरक्षण सोडत जाहीर होणार आहे. या प्रारुप आरक्षण सोडतीवर 24 नोव्हेंबरपर्यंत हरकती आणि सूचना नोंदविता येणार आहेत. त्यानंतर 2 डिसेंबर रोजी अंतिम आरक्षण सोडत जाहीर होणार आहे. त्यानंतरच कोणत्या प्रभागामध्ये कोण उभे राहणार? याचे राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे. पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी नगरसेवकांची संख्या 165 असून, 41 प्रभाग आहेत. त्यापैकी 40 प्रभाग चार सदस्यीय, तर 38 क्रमांकाचा आंबेगाव-कात्रज प्रभाग पाच सदस्यीय आहे. 165 नगरसेवकांच्या जागांपैकी 50 टक्के जागा महिलांसाठी राखीव आहेत. त्यामुळे 83




नगरसेविका आणि 82 नगरसेवक असणार आहेत. अनुसूचित जातींसाठी (एससी) 22 तर अनुसूचित जमातींसाठी (एसटी) 2 जागा आरक्षित आहेत. तसेच ओबीसीसाठी 44 जागा राखीव आहेत.

या आरक्षण सोडतीसाठी राज्य निवडणूक आयोगाने नियमावली जाहीर केली आहे. या नियमावलीनुसार आधी एसटी, एससी त्यानंतर ओबीसीचे आरक्षण काढले जाणार आहे, तसेच एक आरक्षण असलेल्या ठिकाणी चक्राकार पद्धतीने ते आरक्षण असणार आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गांसाठी आरक्षित प्रभागांची सोडत काढली जाते. या सोडतीतूनच कोणत्या प्रभागातून कोण उमेदवार असणार, हे ठरणार आहे. त्यामुळे इच्छुकांचे 11 नोव्हेंबरच्या आरक्षण सोडतीकडे लक्ष लागले आहे. आरक्षित जागांची संख्या निश्चित राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणे- 30 ऑक्टोबर ते 4 नोव्हेंबर

आरक्षण सोडतीची जाहीर सूचना प्रसिद्ध करणे - 8 नोव्हेंबर आरक्षणाची सोडत काढून सोडतीचा निकाल राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करणे. - 11 नोव्हेंबर प्रारुप आरक्षण हरकती व सूचना मागविण्याचा अंतिम दिनांक - 24 नोव्हेंबर प्रारुप आरक्षणावरील हरकती व सूचनांवर विचार करुन निर्णय घेणे. - 25 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर आयोगाच्या मान्यतेनंतर अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे - 2 डिसेंबर

# सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने शनिवारी न्यू होम मिनिस्टरचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने शनिवारी (दि. 1 नोव्हेंबर) सायंकाळी 6 वाजता, पिंपळे निलख, डी. पी रोड, विशालनगर, हॉटेल रंगला पंजाब शेजारील मैदानावर महिला भगिनींसाठी "न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार शंकर जगताप, माजी आमदार अश्विनीताई लक्ष्मण जगताप, पुणे मनपा च्या माजी नगरसेविका मोनिका मुरलीधर मोहोळ, सामाजिक कार्यकर्त्या स्वप्ना शत्रुघ्न काटे, सामाजिक कार्यकर्ते सचिन साठे व बालगायिका, टीव्ही स्टार सह्याद्री मळेगांवकर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या स्पर्धकास मानाच्या पैठणी सह रोख 1,11,111/- रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

क्रांतीनाना मळेगांवकर हे वतीने न्यू होम मिनिस्टर, खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे सादरीकरण करतील. विजेत्या स्पर्धकांना द्वितीय क्रमांक रुपये 51,111/- रोख व मानाची पैठणी, तृतीय क्रमांक रुपये 31,111/- रोख व मानाची पैठणी तसेच 5 लकी ड्रॉ विजेत्यांना प्रत्येकी 11,111/- रोख व आकर्षक साडी देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच उपस्थित प्रत्येक महिला भगिनींना प्रोत्साहन देण्यासाठी आकर्षक साडी भेट देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचा समारोप रात्री 9 ते 11 या वेळेत स्नेहभोजन देण्यात येणार आहे अशी माहिती आयोजक सचिन साठे सोशल फाउंडेशन च्या वतीने प्रसिद्धीस दिली आहे.




# येत्या गुरुवारी शहरातील विविध भागातील पाणीपुरवठा राहणार बंद!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : निगडी भक्ती शक्ती चौकात मेट्रोचे काम सुरु असून, या कामासाठी सेक्टर 23 येथील जलशुद्धीकरण केंद्रातून नेहरुनगरकडे जाणारी मुख्य जलवाहिनी स्थलांतरित (शिफ्ट) करावी लागणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हे काम 30 ऑक्टोबर 2025 रोजी करण्यात येणार आहे.

जलवाहिनी स्थलांतरित करण्याच्या कामासाठी, सदर जलवाहिनीवरुन पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या



नेहरुनगर, संत तुकारामनगर, महेशनगर, गंगानगर, वल्लभनगर, कासारवाडी, फुगेवाडी तसेच चिखली येथील हरगुडे वस्ती, पवार वस्ती, कुदळवाडी, जाधववाडी इत्यादी भागातील 30 ऑक्टोबर रोजी संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच शुक्रवार (31 ऑक्टोबर 2025) रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल.

नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करुन ठेवावा आणि पाणी काटकसरीने वापरुन मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

निगडी परिसरातील मेट्रो कामाशी संबंधित जलवाहिनी स्थलांतरित करण्याचे काम तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचे असून, ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

नागरिकांना होणारा तात्पुरता गैरसोय टाळण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत. तरी नागरिकांनी सहकार्य करावे.

प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

# लग्नाचे आमिष दाखवून घटस्फोटीत महिलेवर अत्याचार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : निगडी भक्ती शक्ती चौकात मेट्रोचे काम सुरु असून, या कामासाठी सेक्टर 23 येथील जलशुद्धीकरण केंद्रातून नेहरुनगरकडे जाणारी मुख्य जलवाहिनी स्थलांतरित (शिफ्ट) करावी लागणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने हे काम 30 ऑक्टोबर 2025 रोजी करण्यात येणार आहे.

जलवाहिनी स्थलांतरित करण्याच्या कामासाठी, सदर जलवाहिनीवरुन पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या नेहरुनगर, संत तुकारामनगर, महेशनगर, गंगानगर, वल्लभनगर, कासारवाडी, फुगेवाडी तसेच चिखली येथील हरगुडे वस्ती, पवार



वस्ती, कुदळवाडी, जाधववाडी इत्यादी भागातील 30 ऑक्टोबर रोजी संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच शुक्रवार (31 ऑक्टोबर 2025) रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल.

नागरिकांनी पाण्याचा पुरेसा साठा करुन ठेवावा आणि पाणी काटकसरीने वापरुन मनपाला सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

निगडी परिसरातील मेट्रो कामाशी संबंधित जलवाहिनी स्थलांतरित करण्याचे काम तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचे असून, ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांना होणारा तात्पुरता गैरसोय टाळण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत. तरी नागरिकांनी सहकार्य करावे.

प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

# ज्येष्ठ नागरिकाकडे बतावणी करत सोनसाखळी लंपास

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : ज्येष्ठ नागरिकाकडे बतावणी करुन चोरट्यांनी सोनसाखळी लांबविल्याची घटना पाषाण-सूस रस्त्यावर घडली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार 70 वर्षीय ज्येष्ठ नागरिक पाषाण-सूस रस्त्यावरील पदपथावरुन निघाले होते. त्यावेळी दुचाकीवरुन आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांना अडवले. 'क्या अंकल किधर है, बहोत दिन हो गये मिले नहीं',अशी विचारणा चाोरट्यांनी केली. त्यावेळी ज्येष्ठ नागरिकांनी चोरट्यांकडे ओळख




विचारली. तेव्हा दुचाकीवरील एक चोरटा उतरला आणि त्याने ज्येष्ठ नागरिकाच्या पाया पडण्याचा बहाणा केला.'आम्हाला मंदिरात दान करायचे आहे', असे सांगून चोरट्याने त्यांना बिस्किटचा पुडा दिला. त्यावेळी ज्येष्ठ नागरिकाने चोरट्यांना जाण्यास सांगितले. चोरट्यांनी त्यांना बोलण्यात गुंतवून नकळत त्यांच्या गळ्यातील एक लाख 20 हजारांची सोनसाखळी काढून घेतली आणि चोरटे दुचाकीवरुन पसार झाले.

काही वेळानंतर गळ्यातील सोनसाखळी चोरट्यांनी लांबविल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

ज्येष्ठ नागरिकाकडे बतावणी करुन चोरट्याने त्यांच्याकडील 78 हजार रुपयांची सोन्याची अंगठी लांबविल्याची घटना सिंहगड रस्त्यावरील माणिकबाग परिसरात नुकतीच घडली.

शहर परिसरात गेल्या काही दिवसांपासून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

# महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी पुण्याहून 300 विद्यार्थी निघणार मुंबईला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : मुंबईच्या नेरुळ येथील डी. वाय. पाटील स्टेडियम येथे गुरुवार दि. 30 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामन्यासाठी पुण्याहून 3 शाळांमधील सुमारे 300 विद्यार्थी गुरुवार दि. 30 ऑक्टोबर रोजी सकाळी 6 वाजता मुंबईकडे निघत आहेत. पुण्यातील एड्स बाधित मुलांचे संगोपन व शिक्षण करणारी मानव्य संस्था (45 विद्यार्थी) तुळापुर वळूज येथील ईशान्य भारतातील विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी ईश्वरपूरम संस्था (45 विद्यार्थी) आणि निंबाळकर गुर्जरवाडी येथील सुमती बालवन शाळा (150 विद्यार्थी) शिक्षक व स्वयंसेवकांसह गुरुवार 30 ऑक्टोबर रोजी या तीन शाळांमधून सकाळी 6 वाजता वातानुकुलीत बसेस मधून मुंबईकडे प्रयाण करणार आहेत. एक्झिम इंटिग्रेटेड क्लब (EIC ट्रस्ट) यांचा सहयोग यासाठी लाभला आहे अशी माहिती या संकल्पनेचे जनक व बँकिंग तज्ञ शशांक वाघ आणि EIC ट्रस्टचे खजिनदार व या प्रकल्पाचे




प्रमुख प्रदीप चव्हाण यांनी दिली.

त्यांनी सांगितले की हे विद्यार्थी 8-9 वर्षांपासून 15 वर्षे वयोगटातील असून गरीब कुटुंबातील आहेत. एक्सप्रेस वे, अटल सेतू मार्ग, गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राईव्ह, गिरगाव चौपाटी समुद्र असे या विद्यार्थ्यांना दाखवून झाल्यानंतर दुपारी हे विद्यार्थी डी. वाय. पाटील स्टेडीयम मध्ये येतील. एक्सप्रेस वे, अटल सेतू मार्ग, मुंबई, समुद्र, स्टेडीयम मध्ये क्रिकेट मॅच बघणे या सर्वांची अनुभूती हे विद्यार्थी प्रथमच घेणार आहेत.

त्यांनी पुढे सांगितले की या सर्व विद्यार्थी व सोबतच्या शिक्षक व स्वयंसेवकांना सकाळी नाश्ता, दुपार व रात्रीचे भोजन तसेच स्टेडीयम मध्ये नाश्ता व कोल्ड ड्रिंक दिली जाणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना विशेष टी-शर्ट आणि टोपी देखील दिली जाणार आहे. भारतीय महिला खेळाडूंना चीअर अप करण्यासाठी या विद्यार्थ्यांसमवेत ढोल-लेझीम व शंख-ध्वनी पथक देखील नेण्यात येणार आहे. प्रत्यक्ष मॅच बघतानाचा विद्यार्थ्यांचा फोटो त्याला भेट म्हणून दिला जाईल. यानिमित्त विशेष गाणे बसविण्यात आले असून त्याच्या तालावर स्टेडीयम मध्ये डान्स करीत हे विद्यार्थी भारतीय महिला खेळाडूंना प्रोत्साहन देतील असे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी 'बुक माय शो' ने एकाच ब्लॉकमधील 300 तिकिटे उपलब्ध करुन दिलेली असून टी. व्ही. ऐवजी प्रत्यक्ष स्टेडीयममध्ये तेदेखील मुंबईत जाऊन आंतरराष्ट्रीय क्रिकेट मॅच बघण्याचा आनंद मिळणार असल्यामुळे या विद्यार्थांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे असे शशांक वाघ आणि प्रदीप चव्हाण यांनी सांगितले.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनधिकृत फ्लेक्सवर तात्काळ कारवाई करा – आयुक्त श्रावण हर्डीकर

## निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकाऱ्यांची पार पडली बैठक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनधिकृत फ्लेक्सवर तात्काळ कारवाई करा. यासाठी गरज पडल्यास पोलिसांची मदत घ्या. शहरात अनधिकृत फ्लेक्स आढळल्यास ते तात्काळ हटवावेत, असे निर्देश आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले. सर्व प्रभाग स्तरावर क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी यासाठी स्वतंत्र पथक नेमावे आणि त्या माध्यमातून कारवाई करण्याची मोहीम सातत्याने राबवावी, अशा स्पष्ट सूचना आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या आहेत.



महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नोडल अधिकाऱ्यांची विविध कामकाजासाठी नेमणूक करण्यात आली आहे. या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात आयुक्त हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. आयुक्त हर्डीकर हे दृकश्राव्य माध्यमातून बैठकीत सहभागी झाले होते. निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी बैठकीच्या सुरुवातीला निवडणूक कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली.

अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, नगर सचिव मुकेश कोळप, सह शहर अभियंता बापू गायकवाड, अनिल भालसाखळे, मनोज सेठिया, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, सीताराम बहुरे, प्रदीप खोत, निलेश भदाणे, पंकज पाटील, सहाय्यक आयुक्त राजू घुले, उमेश ढाकणे, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित, अजिंक्य येळे, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक कामकाजात सहभागी अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. निवडणूक कामकाज प्रशिक्षण, मतदान केंद्र, ईव्हीएम व्यवस्थापन, वाहन अधिग्रहण, जनसंपर्क व प्रसिद्धी, स्विप व्यवस्थापन, निवडणूक खर्च व्यवस्थापन, न्याय व विधी कक्ष, संगणकीय कामकाज आदी निवडणूक कामकाजासंबंधी सर्व बाबींचा आयुक्त हर्डीकर यांनी आढावा घेऊन आवश्यक तरतूद ठेवण्याच्या सूचना दिल्या.

तसेच मतदार प्रक्रियेच्या अनुषंगाने तात्काळ करावयाच्या उपाययोजना व कार्यवाही याबाबत संबंधित नोडल अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करुन सोपवलेली जबाबदारी विहित वेळेत चोखपणे पार पाडावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

# नाना काटे सोशल फाउंडेशन व उत्तर भारतीय नागरिक यांच्या वतीने छटपूजा उत्सव संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपळे सौदागर : प्रतिवर्ष प्रमाणे याही वर्षी दि 27 व 28 नोव्हेंबर रोजी पिंपळे सौदागर येथील उत्तर भारतीय नागरिकांसाठी नाना काटे सोशल फौंडेशनच्या वतीने महादेव मंदिरा शेजारील पवना नदी घाटावर छट पूजेचे आयोजन करण्यात आले. तत्पूर्वी छट पूजेसाठी महापालिकेच्या कर्मचाऱ्या कडून नदी घाटाची साफ सफाई करण्यात आली.**



उत्तर भारतीयांच्या दृष्टीने छट पूजा म्हणजे धरणी माता व सूर्य भगवानची पूजा आहे. विवाहित महिला आपली मनोकामना पूर्ण होण्यासाठी तीन दिवस निरंकार उपवास ठेवून वृत ठेवतात.सूर्याला देव मानून संध्याकाळी दीपक व जास्तीत जास्त सर्व प्रकारचे फळे अर्पण करून सूर्य देवाची आराधना केली जाते.दुसरे दिवशी पहाटे 4 वाजता तोच दिवा व फळे नदी मध्ये उभे राहून सूर्योदयाची वाट पाहिली जाते.व सूर्य देवाची उपासना केली जाते.यानंतर सूर्य देवाच्या नावाने पुरोहिताच्या मंत्रोच्चाराने नदीमध्ये दुध अर्पण केले जाते. यानंतर एकमेकांना फळ व प्रसाद वाटला जातो.या मधून एकमेकाविषयी आनंद व आदर व्यक्त करतात. अशा या छट पूजेचे आयोजन पिंपळे सौदागर येथे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रवादीचे नेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांचा उत्तर भारतीय नागरिकांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी मा.नगरसेवक विलास पाडाळे,युवा नेते उमेश काटे, सोनिगरा ज्वेलर्सचे प्रोप्रा.दिलीप सोनिगरा,जितेंद्र सोनिगरा तसेच आयोजक ब्रिजेश सिंह,दुर्गेश कुमार सिंह ,राकेश गुप्ता विनयकुमार गुप्ता ,विजय चौहान,अमरजीत सिंह,मानसिंह,विजय बहादूर प्रजापती,अजय कुमार गुप्ता,जनार्दन सिंह व उत्तर भारतीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579